**F.Y.B.A. SEM – II (CBCS -2016 COURSE) : SUMMER - 2018**
**SUBJECT : MARATHI (G1) - II**

Day : **Monday** Time : **03.00 P.M. To 06.00 P.M.**
Date : **23/04/2018** **S-2018-0029** Max. Marks : 60.

---

**सूचना:**

१) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.
२) उजवीकडील अंक गुणांचा निर्देश करतात.
३) मराठी भाषेच्या लेखननियमांनुसार लेखन करणे आवश्यक आहे.

---

प्र.१ अ) पुढीलपैकी योग्य पर्याय निवडून गाळलेल्या जागा भरा. (०६)

१) नेहरूंच्या मृत्यूच्या बातमीने सारे शहर ----- झाले.
(अ) अंजिरी (ब) गुलमुशी (क) पितांबरी (ड) करडे

२) ----- सणाच्या आदल्या दिवशी-खंडेनवमीला कारखान्यात यंत्रांची पूजा होई.
(अ) दसरा (ब) दिवाळी (क) पाडवा (ड) पौर्णिमा

३) 'झूट बोलून आयुष्य कुणालाही सजवता येते' या काव्यपंक्ती ----- या कवितेतील आहेत.
(अ) ऊठ (ब) धीर (क) बेतून दिलेले आयुष्य (ड) विझता विझता स्वत:ला

४) ----- या कवितेत सुर्वे कष्टकऱ्यांची जीवनकथा सांगतात.
(अ) मुंबई (ब) सनद (क) विझता विझता स्वत:ला (ड) चारशब्द

५) नारायण सुर्वे यांच्या ----- या कवितेतून गिरणीच्या दुनियेचे शब्दचित्र अवतरले आहे.
(अ) कर्जपुत्र (ब) विचार (क) क्षणांत जिंकीन (ड) गिरणीची लावणी

६) ----- ही कविता म्हणजे २० व्या शतकातील माणसांना उद्देशून कवीने केलेले आवाहन आहे.
(अ) सांग (ब) पहारा (क) माझी आई (ड) जाहिरनामा

ब) पुढील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (०६)

१) नारायण सुर्वे यांची परमदैवते कोणती?
२) १९६४ च्या मे महिन्याच्या एका संध्याकाळी अंत:करण विलक्षण गदगदवून टाकणारी कोणाच्या मृत्यूची बातमी समजली?
३) 'मोजलेत सर्व खांब ह्या रस्त्यांचे, वाचली पाट्यांवरची बाराखडी' या कवितेच्या ओळी कोणत्या कवितेतील आहेत?
४) नारायण सुर्वे यांना कोणता वाद प्रिय आहे?
५) विश्वाचा केंद्रबिंदू कोण आहे, असे सुर्वे यांना वाटते?
६) 'कविता' या वाङ्मयप्रकाराची वैशिष्ट्ये लिहा.

प्र.२ 'कविता' या वाङ्मयप्रकाराची वैशिष्ट्ये लिहा. (१२)

**किंवा**

नारायण सुर्वे यांनी 'शब्दांचे ईश्वर' या कवितेतून भांडवलदारी समाजाचे उपरोधिक चित्र कसे रेखाटले आहे- सोदाहरण लिहा.

कृ.मागे पहा

**प्र.३** पुढीलपैकी कोणत्याही **दोन** प्रश्नांची उत्तरे लिहा. (१२)

**क)** 'डोंगरी शेत' या कवितेतून कष्टकरी स्त्रियांच्या वेदनांचे दर्शन कसे घडते?
**ख)** 'मनी आडर' कवितेतून वेश्यावस्तीतील स्त्रियांचे दर्शन कसे घडते?
**ग)** 'माझे विद्यापीठ' कवितेचा आशय तुमच्या शब्दात लिहा.

**प्र.४** पुढीलपैकी कोणत्याही **तीन** विषयावर विवेचक टीपा लिहा. (१२)

**क)** 'असा कसा दगड झालो' मधील बाप
**ख)** 'ऊठ' कवितेतील हितगूज
**ग)** 'बेतून दिलेले आयुष्य' मधील साचेबंदपणा
**घ)** 'माझ्या देशाच्या नोंदबुकात माझा अभिप्राय' कवितेचा आशय
**च)** 'थरकू नको' कवितेतील भावतरलता

**प्र.५ अ)** आपल्या महाविद्यालयातील 'राष्ट्रीय सेवा योजना' शिबीराचा **वृत्तांत** लिहा. (०६)

**किंवा**

''स्मरणिका संपादन ही एक कलानिर्मितीच आहे''- सोदाहरण लिहा.

**आ)** मुलाखतीचे लेखन करताना कोणती काळजी घ्यावी लागते, ते लिहा. (०६)

**किंवा**

'ग्रंथवाचन' ही ग्रंथपरीक्षणाची पहिली पायरी आहे- सोदाहरण लिहा.

* * *